# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विटा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0086 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**27/02/2026 23:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिंनाक पासून):** 27/02/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 27/02/2026
   **Time From (वेळेपासून):** 10:47 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 27/02/2026 **Time (वेळ):** 23:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 052

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 27/02/2026 23:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उप विभागीय दंडाधिकारी कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** योगेश रमेश चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अन्टी करप्शन ब्युरो, सं◌ागली ,सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अन्टी करप्शन ब्युरो, सं◌ागली ,सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8108601919

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश आण्णा शिंदे | | | 1. इस्लामपूर,इस्लामपूर,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 27.02.2026

मी श्री. योगेश रमेश चव्हाण, वय - 38 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 8108601919

सरकारतर्फे फिर्यादी होवून देतो फिर्यादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 26/02/2026 रोजी मी कार्यालयात हजर असताना पोलीस उप-अधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांनी आम्हास त्यांचे कक्षामधून बोलावून घेवून तक्रारदार श्री.कौस्तुभ अंकुश सुर्वे, रा. विटा यांनी फोनव्दारे संपर्क करून त्यांची श्री. शिंदे, क्लार्क प्रांत कार्यालय विटा यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवली असलेचे सांगून त्यांची तक्रार विटा येथे येवून घेण्याची विंनती केली असता तक्रारदार यांना आम्ही पथकासह दि.27.02.2026 रोजी सकाळी 10.00 वा चे सुमारास विटा येथे येत असलेचे कळवून संपर्क करीत असल्याचे सुचना दिल्या असल्याचे सांगितले. तसेच इनामदार मॅडम यांनी मला तक्रारदार यांची तक्रार ऐकुन पुढील कारवाई करणेच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी लागलीच मा. सहा. आयुक्त, समाज कल्याण विभाग सांगली यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन पुरुष कर्मचारी यांची पंच सेवा इकडील कार्यालयात पाठवण्याबाबत विंनती करून पंच साक्षीदार यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्यांना दि. 27.02.2026 रोजी सकाळी 08.00 वाजता एसीबी कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.27.02.2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 08.15 वा चे सुमारास एसीबी कार्यालय येथे आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी दोन्ही पंचांना एक लोकसेवक यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील, पोकॉ/चंद्रकांत जाधव व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, पिं्रटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अं्थ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून कार्यालयातून 08.30 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, माधवनगर, बुधगाव, तासगाव मार्गे, विटा गावचे अलीकडे अंदाजे 4 कि.मी. अंतरावर असले मिना पेट्रोल पंपांचे बाजूस रोडकडेला सुरक्षित ठिकाणी 09.50 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर इनामदार मॅडम यांनी तक्रारदार यांना संपर्क करून आमचेकडील वाहनाचे वर्णन सांगून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. कौस्तुभ सुर्वे हे त्यांचेकडील मारूती अल्टो कार क्र.एमएच-10-डीजी-3641 मधून आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सुर्वे यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. सुर्वे यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. दिनेश बाळासाहेब कलकुटगी यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री.रोहन संजय दळवी यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. सुर्वे यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांचे 1 व त्यांचे सहकारी वकील यांनी 4 पक्षकारां मार्फत जन्म-मृत्यु नोंदणीचे अर्ज वकीलपत्र घेवून प्रांत कार्यालय विटा येथे पुढील आदेशासाठी दाखल केले होते. त्यावेळी प्रांत कार्यालय विटा येथील क्लार्क रमेश शिंदे यांनी त्यांचेकडे पुर्वी दिलेल्या 4 अर्जांच्या निकालाचे व प्रलंबित 1 अर्जाच्या निकालाचे असे एकुण 5 अर्जाचे 5,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे अशा आशयाची हकीकत सांगीतले.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सुर्वे यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. सुर्वे यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला. सदर तक्रारी अर्जाचे मध्ये " मी हणमंतनगर विटा येथे राहणेस असुन मी सुमारे तीन वर्षापासुन मा.विटा न्यायालयामध्ये वकील व्यवसाय करीत आहे. मी दिवाणी, फौजदारी तसेच महसुल विषयक काम करीत असतो. पक्षकार यांचेकडील जन्म मृत्यु दाखल्यांची नोंद संबंधित ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांचेकडे एक वर्षाचे मुदतीत झालेली नसलेस सदरची नोंद करणेबाबत उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी दर्जाचे अधिकारी यांचेकडे अर्ज करुन त्यांचे आदेशाने पक्षकार यांचे जन्म मृत्यु नोंद होत असते.

दि.22.05.2024 रोजी 1) श्री हुजेफा महमुद शिकलगार रा.भाळवणी ता.खानापुर यांचा जन्म दाखला ग्रामपंचायत भाळवणी येथे मुदतीत नोंद न झालेने ते माझेकडे आलेले होते त्यांचे सदर कामाचे वकीलपत्र मी घेतलेले होते. त्यानंतर मी मा.उपविभागीय अधिकारी विटा उपविभाग विटा यांचेकडे पक्षकार 1) श्री हुजेफा महमुद शिकलगार यांचे जन्माचे नोंदीचा जन्म मृत्यु रेकॉर्ड सदरी होणेबाबतचा आदेश मिळणेकरीता क्रमांक 90/2024 प्रमाणे अर्जदारातर्फे अॅडव्होकेट म्हणुन अर्ज केलेला होता. तसेच 2) दि. 19.08.2025 रोजी पक्षकार श्री नाजीम महंमद हानिफ मुल्ला रा.ऊरण इस्लामपुर ता.वाळवा यांचा जन्म दाखलाबाबत 3) दि.22.08.2025 रोजी शहनाज रहिमतुल्ला शिकलगार रा.भाळवणी ता.खानापुर यांचा जन्माचा दाखल्याबाबत 4)दि.04.11.2025 रोजी दिंगबर दत्तु खेराडे रा.भाळवणी ता.खानापुर यांचे वडिल कै. दत्तु शामु खेराडे यांचे मृत्युचे दाखल्याबाबत 5) दि. 03.12.2025 रोजी श्री शहनाज जैनुददीन मुल्ला रा.भाळवणी ता.खानापुर यांचे जन्माचे दाखल्याबाबत संबंधित पक्षकार माझेकडे आलेले होते परंतु माझेकडील अतिरिक्त कामामुळे पक्षकार क्रमांक 2 ते 5 यांचे जन्म मृत्युची प्रकरणे माझे सहकारी मित्र अॅडव्होकेट श्री सचिन सिध्देश्वर चव्हाण रा.विटा यांचेकडे मी दिलेली होती व सदर प्रकरणांचे वकीलपत्र त्यांचेकडे होते परंतु सदर कामातील अॅफिडेव्हीटमध्ये मी माझी ओळख म्हणुन दिलेली होती. वरील सर्व प्रकरणे मा.उपविभागीय अधिकारी विटा उपविभाग यांचे कोर्टात दाखल केलेले होते. वरील सर्व प्रकरणांची सुनावणी श्री विक्रम बांदल उपविभागीय अधिकारी विटा उपविभाग विटा यांचेकडे होती.

वरील प्रकरणापैकी पक्षकार क्रमांक 2 ते 5 यांचे जन्म मृत्युबाबतचे विटा उपविभागीय अधिकारी यांचेकडील आदेश उपविभागीय अधिकारी विटा कार्यालयातील क्लार्क श्री रमेश शिंदे यांचेकडुन अॅडव्होकेट श्री सचिन चव्हाण यांना मिळालेले होते. दि.26.02.2026 रोजी पक्षकार श्री हुजेफा महमुद शिकलगार रा.भाळवणी ता.खानापुर यांचा जन्म दाखलाबाबतचे आदेशाबाबतची माहिती घेणेकरीता मी उपविभागीय अधिकारी विटा यांचे कार्यालयामध्ये गेलेलो होतो. त्यावेळी कार्यालयामध्ये क्लार्क श्री रमेश शिंदे हे उपस्थित होते. मी त्यांना श्री हुजेफा शिकलगार यांचे जन्म दाखल्याचे आदेशाबाबतची विचारणा केली असता त्यांनी मला पुर्वीचे श्री सचिन चव्हाण यांचेकडील चार प्रकरणांचे व माझेकडील श्री हुजेफा महमुद शिकलगार रा.भाळवणी यांचे प्रकरणाचे असे एकुण पाच प्रकरणांचे पाच हजार रुपये दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे पाच हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना सदर आदेशाकरीता पैसे दयावे लागत नसलेचे सांगितले परंतु श्री रमेश शिंदे यांनी मला प्रत्येक प्रकरणाचे एक हजार रुपये प्रमाणे मागील चार व सध्याचे श्री हुजेफा शिकलगार यांचे प्रकरणाचे एक असे एकुण पाच हजार रुपये दिलेशिवाय श्री हुजेफा शिकलगार यांचे प्रकरणाचा आदेश मिळणार नाही असे मला सांगितले.

मी श्री रमेश शिंदे क्लार्क विटा उपविभागीय कार्यालय विटा यांना 5,000/- रुपये नाही दिले तर ते माझेकडील पक्षकार श्री हुजेफा महमुद शिकलगार रा.भाळवणी ता.खानापुर यांचा जन्म दाखला प्रकरणाचा आदेश देणार नाहीत याची मला खात्री आहे. मी उपविभागीय कार्यालय विटा येथे जावुन श्री रमेश शिंदे क्लार्क यांची आज भेट घेणार आहे. श्री रमेश शिंदे क्लार्क विटा उपविभागीय कार्यालय विटा हे माझ्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करणार याची मला खात्री आहे. मला रमेश शिंदे क्लार्क विटा उपविभागीय कार्यालय विटा यांना लाच देण्याची इच्छा नाही.

माझेत व श्री रमेश शिंदे क्लार्क विटा उपविभागीय कार्यालय विटा यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार नाही तसेच आमचेत कोणताही भांडण तंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विंनती. तसेच सोबत मी हजेफा महमुद शिकलगार यांचे प्रकरणाची छायांकित प्रत सादर करीत आहे." अशी हकीकत तक्रारी अर्जामध्ये नमूद आहे. त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. सुर्वे यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेवक श्री.रमेश शिंदे, क्लार्क, प्रांत कार्यालय विटा यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर आम्ही 10.35 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याची खात्री करून दिली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सुर्वे व पंच क्र.1 कलकुटगी यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या. मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 10.47 वाजता सुरु करुन तक्रारदार श्री. सुर्वे यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून तक्रारदार श्री. सुर्वे व पंच नं.1 श्री. कलकुटगी यांना प्रांत कार्यालय विटा येथे लोकसेवक श्री.रमेश शिंदे, क्लार्क यांची भेट घेणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच नं.1 कलकुटगी असे तक्रारदार यांचेकडील मारूती अल्टो कार क्र.एमएच-10-डीजी-3641 मधून रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. सुर्वे व पंच नं.1 कलकुटगी असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 11.19 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री.कलकुटगी यांना, लोकसेवक शिंदे यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगितली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना होवून विटा गावातून प्रांत कार्यालय विटा येथे दाखल झालो. त्यावेळी आम्ही कार्यालयाचे पार्किंगमध्ये कार पार्क करून तक्रारदार व मी असे चालत आतमध्ये गेलो. त्यावेळी तक्रारदार सुर्वे यांनी कार्यालयामध्ये रमेश आण्णा शिंदे, निम्न श्रेणी (लघुलेखक) असा काचेवर बोर्ड असले लोकसेवक यांचे खुर्चीजवळ जावून बोलू लागले. त्यावेळी सदर लोकसेवक हे श्री.रमेश शिंदे असल्याचे माझी खात्री झाली.

त्यावेळी तक्रारदार यांनी "हुजेफा शिकलगार" याचे प्रकरणांबाबत लोकसेवक शिंदे यांचेशी चर्चा केली. त्यावेळी शिंदे यांनी तक्रारदार यांना त्यांचे नावाची खात्री करून घेण्यास सांगितली. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी "हुजेफा महमंद शिकलगार" यांचे नावाची खात्री केली. त्यावेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना "तुम्ही सांगा मी काय बोलत न्हाय" असे म्हणून रक्कम सांगणेस सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी शिंदे यांनाच रक्कम सांगणेस सांगितली. त्यावेळी शिंदे यांनी तक्रारदार यांना "पहिली चार काम घेवुन गेला ... सहा देतो ..परत म्हणला पाच देतो...." असे म्हणाले. त्यावर तक्रारदा यांनी "पाच हजार फिक्स ना?" असे विचारले असता शिंदे यांनी "आणी हाच एक हजार" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "पाच मध्ये करा की? असे विचारले असता शिंदे यांनी "हा चला आता... लई विचार करत नाही मी... चला जाऊदे" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "पाच हजारात डन ना?" असे विचारले असता शिंदे यांनी "हो" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 5,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार व मी तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" अशी हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सुर्वे यांना पडताळणी कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं. 1 यांचे हकिकत प्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. सुर्वे व लोकसेवक श्री.रमेश शिंदे यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारअॅन्टी करप्शन ब्युरो, संागली वाई मध्ये, लोकसेवक श्री. रमेश शिंदे यांनी तक्रारदार यांनी एक व त्यांचे सहकारी वकील यांनी चार पक्षकांराचे जन्म-मृत्यु नोंदणीचे पुर्वी झालेल्या एकुण 4 अर्जांच्या निकालाचे व प्रलंबित एका अर्जाच्या निंकालाचे असे एकुण 5 अर्जाचे तक्रारदार यांचेकडे प्रमाणे 5,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच शिंदे यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रलंबित काम झालेनंतर फोन करीत असल्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक श्री. रमेश शिंदे यांचा तक्रारदार श्री.सुर्वे यांना फोन आलेनंतर पुढील सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर तक्रारदार श्री.सुर्वे यांनी त्यांचे विटा कोर्टामध्ये काम असल्याने ते थोडया वेळात कोर्टामध्ये जावून येत असलेचे सांगितले. त्यावेळी मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री.शिंदे यांचा फोन आल्यास त्यांचा फोन न उचलण्याचा तसेच तात्काळ आम्ही थांबलो त्याठिकाणी हजर राहणेच्या सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. शिंदे हे 13.00 वा चे सुमारास निघून गेले. त्यानंतर आम्ही व सापळा पथक असे तेथेच थांबून राहिलो.
त्यानंतर 14.30 वा चे सुमारास तक्रारदार श्री. सुर्वे हे आम्ही थांबलो त्याठिकाणी आमचे समक्ष हजर झाले. व त्यांनी लोकसेवक श्री. शिंदे यांचे त्यांचे मोबाईलवर 13.57 व 13.58 वाजता फोन आला असता त्यांनी त्यांचा फोन स्विकारला नसल्याची हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक श्री.शिंदे यांना तक्रारदार यांचे मोबाईलवरून फोन करून पडताळणी करण्याचे निश्चित केले.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी तक्रारदार सुर्वे यांना फोनवर बोलणे संदर्भातील व फोन स्पिकर मोडवर घेवून बोलण्याच्या सुचना दिल्या. मी दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री.सुर्वे यांनी त्यांचे मो.क्र. 9325272798 वरून लोकसेवक श्री.शिंदे यांचे मो.क्र.7620493114 यावर 14.34 व 14.41 वा चे सुमारास कॉल केला असता लोकसेवक शिंदे यांनी त्यांचा कॉल स्विकारला नाही.

त्यानंतर 14.50 वाजता तक्रारदार सुर्वे यांनी त्यांचे मोबाईलवर लोकसेवक शिंदे यांचा कॉल येत असल्याचे आम्हास पंचांसमक्ष सांगितले. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार यांनी शिंदे यांचा कॉल स्विकारून फोन स्पिकर मोडवर घेतला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 14.50 वाजता सुरू करून तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी लोकसेवक शिंदे यांनी तक्रारदार यांना त्यांचे काम झाले असल्याचे सांगून लागलीच प्रांत कार्यालयात बोलविले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना थोडया वेळात येत असल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक शिंदे यांनी तक्रारदार यांना आलेनंतर फोन करण्यास सांगून "पाकीटात घालून आणा" असे म्हणून पैसे पाकीटात घालून आणण्यास सांगून फोन कट केला.

त्यानंतर आम्ही लोकसेवक रमेश शिंदे यांचेविरूध्द प्रांत कार्यालय विटा येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सुर्वे यांना लोकसेवक शिंदे यांनी मागणी केलेली 5,000/- रूपये हजर करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार श्री. सुर्वे यांनी त्यांचेकडील 500/- रूपये दराचे 10 नोटा असे एकुण 5,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसअॅन्टी करप्शन ब्युरो, संागली मक्ष हजर केले. त्यावेळी तक्रारदार यांना पाकीट उपलब्ध आहे का? असे विचारले असता त्यांनी "आता गडबडीत शक्य नाही, शिंदे यांनी पाकीटाबाबत विचारले तर मी त्यांना कोर्टातून गडबडीत आलो असल्याचे सांगून वेळ मारून नेईल" असे सांगितले.

त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 5,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तअॅन्टी करप्शन ब्युरो, संागली क्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोकॉ/चंद्रकांत जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटांची घडी करून तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे खिश्यामध्ये ठेवला व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. रेकॉर्डरमध्ये पडताळणीवेळची मेमरीकार्ड बाहेर काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर आम्ही 15.22 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याच्या खात्री करून दिल्या.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सुर्वे, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार पोकॉ/जाधव यांना मिना पेट्रोलपंप चे बाजूस रोडकडेला थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक शिंदे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.36 वाजता सुरू करून लेसव्दारे तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून लोकसेवक शिंदे यांची प्रांत कार्यालय विटा येथे भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. सुर्वे व पंच नं. 1 श्री. कलकुटगी असे तक्रारदार यांचेकडील मारूती अल्टो कार क्र.एमएच-10-डीजी-3641 मधून रवाना झाले.

त्यांचे पाठोपाठ मी, इनामदार मॅडम, पंच नं. 2 श्री. रोहन संजय दळवी, पोना/प्रितम चौगुले, पोशि/अजित पाटील व चालक रजपूत असे लॅपटॉप, पिंरटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून रवाना झालो. पोकॉ/जाधव हे मिना पेट्रोलपंप चे बाजूस सुटकेससह थांबून राहिले.

तक्रारदार व पंच नं.1 असे विटा शहरामधून खानापूर नाका, हणमंत नगर येथे प्रांत कार्यालय विटा कार्यालयाचे पार्किंगमध्ये गेले. लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे चालक रजपूत यांनी आमचेकडील वाहन तक्रारदार यांचेकडील



Scanned with OKEN Scanner

वाहनापासून काही अंतरावर कार्यालयाचे बाहेरील बाजूस थांबवली. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 कलकुटगी असे कारमधून खाली उतरून प्रांत कार्यालयाचे समोर थांबलेचे दिसले. लागलीच मी, पंच नं.2, इनामदार मॅडम व अंमलदार चौगुले व पाटील असे आमचेकडील वाहनामधून खाली उतरून प्रांत कार्यालय विटा कार्यालयाचे आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिलो.

त्यावेळी तक्रारदार यांना दिलेल्या सुचनांप्रमाणे त्यांनी प्रांत कार्यालय येथे पोहचल्यावर शिंदे यांना फोन केला. काही वेळाने एक अनोळखी इसम हा प्रांत कार्यालय विटा येथून बाहेर येवून तक्रारदार व पंच नं.1 थांबले ठिकाणी आला व तक्रारदार यांचेशी चर्चा करू लागला.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री.सुर्वे यांनी बाजुस येवून त्यांचे खिश्यातील हातरुमाल बाहेर काढून हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी अनोळखी इसम हा प्रांत कार्यालयामध्ये गेला. लागलीच मी व सापळा पथक असे तक्रारदार, व पंच नं.1 कलकुटगी हे थांबले ठिकाणी गेलो. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोना/चौगुले यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.55 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर मी, सापळा पथक असे प्रांत कार्यालयामध्ये जावून लोकसेवक श्री.रमेश शिंदे यांना ताबेत घेवून कार्यालयामधील अभ्यागत कक्षा मध्ये घेवून आलो. त्यावेळी मी पंच नं.1 यांना लोकसेवक शिंदे यांनी लाचेची रक्कम कोठे ठेवली आहे अशी विचारणा केली असता त्यांनी लोकसेवक शिंदे यांनी लाचेची रक्कम त्यांचे पॅन्टचे डावे खिश्यामध्ये ठेवली असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले. मी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 दळवी यांनी लोकसेवक शिंदे यांचे पॅन्टची तपासणी केली असता शिंदे यांचे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिश्यामध्ये 500/- रूपये दराच्या 10 नोटा मिळून आल्या.

त्यानंतर पंच नं.2 दळवी यांनी सदर 500/- रूपये दराच्या नोटांचे नंबरची पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळापुर्व कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्री. दळवी यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगितली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली. त्यानंतर आम्ही लोकसेवक शिंदे यांची कार्यालयाचे अभ्यागत कक्षामध्ये जरूर तो अंधार करून अॅल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात त्यांचे हातांची, कपडयांची तपासणी केली असता शिंदे यांचे दोन्ही हातांचे बोटास व पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिश्यास ठिक-ठिकाणी अॅन्थ्रॉसिन पावडर लागलेची निळसर चकाकी दिसून आली. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर मी लोकसेवक श्री. शिंदे यांना माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मी श्री. शिंदे यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. रमेश आण्णा शिंदे, वय - 55 वर्षे, पद - लघुलेखक, निम्न श्रेणी, वर्ग-3 उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी कार्यालय विटा उप विभाग विटा, रा. सर्वे नं.96/2 श्रीनिवास, संभाजीनगर, सांगली पेठ रोड इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही लोकसेवक शिंदे यांना तक्रारदार यांचे प्रलंबित कामाचे फाईलची विचारणा केली असता त्यांनी सदरची फाईल त्यांचे कपाट मध्ये असल्याचे सांगून तक्रारदार यांचे प्रलंबित प्रकरणाचे फाईल व रजिष्टर आमचे समक्ष हजर केली. सदरची कागदपत्रे व रजिष्टर आम्ही ताब्यात घेतली.

त्यानंतर आम्ही गोपनीयतेच्या दृष्टीने व कारवाईच्या सोईकरीता शासकीय विश्रामगृह विटा येथे जाणेचे निश्चित केले. मी तक्रारदार यांना शासकीय विश्रामगृह विटा येथे जाणेस सांगितले. त्यानंतर आम्ही लोकसेवक शिंदे यांना ताबेत घेवून प्रांत कार्यालय विटा येथून 16.30 वा चे सुमारास रवाना होवून 16.40 वा शासकीय विश्रामगृह विटा येथे दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं.1 श्री. कलकुटगी यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील कार मधून रवाना होवून प्रांत कार्यालय विटा येथे दाखल झालो. त्यावेळी आम्ही कारमधून खाली उतरून कार्यालयाचे बाहेरील मोकळे जागेमध्ये गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी शिंदे यांना कॉल करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी शिंदे यांनी बाहेर येत असल्याचे सांगितले.

त्यानंतर शिंदे हे प्रांत कार्यालयातून बाहेर आले व तक्रारदार सुर्वे यांचेशी बोलू लागले. त्यावेळी शिंदे यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रकरणावर सही झाली असल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे पुर्वीचे 4 प्रकरणातील अर्जदार यांचे नावे सांगून त्याबाबत चर्चा केली.

त्यावेळी तक्रारदार यांनी शिंदे यांना "सांगीतलय तेवढ... म्हणलाय तेवढ आणलय तुम्ही" असे म्हणून तक्रारदार



Scanned with OKEN Scanner

यांनी त्यांचे पॅन्टचे उजवे बाजूस ठेवली लाच रक्कम बाहेर काढुन शिंदे यांचेसमोर धरली असता शिंदे यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून "हो..हो.... ठिक हाय .... नोटीस कुठली पुढची काढायचाय काय...... पाच हायत?" असे विचारले असता तक्रारदार यांनी "पाच हायत" असे म्हणाले. त्यावर शिंदे यांनी "हा" असे म्हणून लाच रक्कम उजवे हातातून त्यांचे डावे हातामध्ये घेवून त्यांचे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. त्यानंतर तक्रारदार यांनी बाजूस येवून त्यांचेकडील हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी लोकसेवक शिंदे हे प्रांत कार्यालयामध्ये गेले. लागलीच आपण व सापळा पथक असे आमचेजवळ आला." वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.सुर्वे यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.1 कलकुटगी यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही शासकीय विश्रामगृह, विटा येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 27/02/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान, लोकसेवक श्री. रमेश शिंदे, लघुलेखक, निम्न श्रेणी, वर्ग-3, उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी कार्यालय विटा उप विभाग विटा, यांनी स्वत: चे पदाचा गैरवापर करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचे एक व त्यांचे सहकारी वकील यांनी चार पक्षकांराचे जन्म-मृत्यु नोंदणीचे पुर्वी झालेल्या एकुण 4 अर्जांच्या निकालाचे व प्रलंबित 1 अर्जाच्या निंकालाचे असे एकुण 5 अर्जांचे तक्रारदार यांचेकडे 5,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच सापळा कारवाईवेळी लोकसेवक श्री. रमेश शिंदे, लघुलेखक, निम्न श्रेणी, वर्ग-3 यांनी उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी कार्यालय विटा उप विभाग विटा कार्यालयाचे समोर आपले स्वत: चे पदाचा गैरवापर करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून लाच रक्कम 5,000/- रूपये स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविला आहे. म्हणुन माझी लोकसेवक श्री. रमेश आण्णा शिंदे, वय - 55 वर्षे, पद - लघुलेखक, निम्न श्रेणी, वर्ग-3, उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी कार्यालय विटा उप विभाग विटा, रा. सर्वे नं.96/2 श्रीनिवास, संभाजीनगर, सांगली पेठ रोड इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे. माझा वरील फिंयादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा दिला वर्दीजबाब, अॅन्टी करप्शन ब्युरो, संागली

समक्ष अॅन्टी करप्शन ब्युरो, संागली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dhananjay yashwant phadtare(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

27/2/20

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): dhananjay yashwan

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

H.C.168
पो. स्टे. ऑफिसर
विटा पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner